# " प्रादेशिकतावाद : राष्ट्रीय एकत्मतेपुढील समस्या "

**कुणाल दिलीप राठोड** ( राज्यशास्त्र विभाग ) डॉ. शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय, कळमनुरी, जिल्हा - हिंगोली.

---

**गोषवारा :**

भारताच्या राजकीय सामाजिक प्रक्रियेमधील एक महत्त्वाचे घटक म्हणून प्रदेशवादाचा विचार केला जातो. राष्ट्रप्रेमापेक्षाही विशिष्ट प्रदेशाविषयी अधिकचे प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी या भावना प्रदेशवादामध्ये केंद्रस्थानी असतात. राजकीय अभ्यासक, तज्ञ इकबाल नारायण यांच्या मते, प्रदेशवादाचा सकारात्मक दृष्टीने विचार करता त्यात एका विशिष्ट प्रदेशातील लोकांच्या आकांक्षांची पूर्तता करणे हा मुख्य हेतू असतो. प्रदेश वादाकडे नकारात्मक दृष्टीने पाहता त्यात विशिष्ट परिस्थितीमुळे निर्माण झालेली सापेक्ष वंचित तिची जाणीव, भावना प्रतिबिंबित झालेली असते. हा प्रादेशिकतावाद आज भाषिक व सांस्कृतिक अस्मिता, मागासलिपणाची भावना, भौगोलिकता, प्रादेशिक संघटना, विघटनवाद अशा विविध स्वरूपात अविष्कृत होताना दिसतो या प्रादेशिकता वादाच्या अतिरेकामुळे फुटीरतावादी व विघटनवादी शक्ती प्रबळ होऊन त्यातून घटक राज्याची मागणी पुढे येते व राष्ट्रीय एकात्मतेला हादरा बसते.

**प्रस्तावना :**

विशाल असा भौगोलिक आकार, प्रचंड जनसमुदाय त्यासोबतच विविध भाषा, धर्मपंथ, संस्कृती, चालीरीती, सण- उत्सव इ. बाबतीत विविधता ही विविधता जतन करून त्यांचे संरक्षण व विकास साधण्याच्या हेतूने भारतीय घटनाकारांनी संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. संघात्मक राज्यव्यवस्था हा स्वातंत्र्यानंतरच्या काळातील भारतीयांसाठी खऱ्या अर्थाने नवीन प्रयोग होता. हा प्रयोग यशस्वी होण्याकरिता व केंद्र आणि राज्य सरकारने यांच्यात सामंजस्य निर्माण होण्याच्या दृष्टीने घटनाकारांनी राज्यघटनेत केंद्र राज्य संबंधाबाबत स्पष्ट तरतुदी केलेल्या आहेत. भारतीय संघराज्य हे केंद्रोत्सारी पद्धतीने निर्माण झाले असल्यामुळे भारतातील घटक राज्यांना या संघातून फुटून बाहेर पडण्याचा अधिकार प्राप्त झालेला नाही.

अर्थातच राष्ट्रीय एक्य आणि सामर्थ्य यांचा घटनाकारांच्या हक्कांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आज देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष पूर्ण होऊन भारतीय प्रजासत्ताकालाही 73 वर्षे पूर्ण झालेली आहेत. तरीही राष्ट्रीय एक्य आणि एकात्मतेची वृद्धी करणाऱ्या शक्तींना बळकटी आणणे ही भारतीय संघराज्या पुढील आज सर्वात महत्त्वाची आवश्यकता आहे. कोणत्याही सार्वभौम देशाच्या शासनाची सर्वात महत्त्वाची व प्राधान्यक्रमाची जबाबदारी आपल्या देशाच्या एकात्मतेचे रक्षण करणे हीच आहे. या अनुषंगानेच भारतीय राज्यघटनेमध्ये सुद्धा घटनेच्या उद्देश पत्रिकेचे व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राचे एक्य व एकात्मता यांची हमी देणारी बंधुता यासंबंधीची शाश्वती सर्व भारतीय नागरिकांना देण्यासंबंधीचा उल्लेख आहे. त्यातच राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून अनेक तरतुदी करताना देशाच्या संकट काळात किंवा विघटन कार्यशक्ती प्रबळ होताना केंद्र शासन अधिक मजबूत व्हावे व राष्ट्राचे एक्य आणि एकात्मता यांना कोणतीही हानी पोहोचू नये यासाठी घटनाकर्त्यांनी राष्ट्रपतीच्या आणि आणीबाणी विषयक अधिकारांची तरतूद केलेली आहे.

देश विकासाची विविध क्षेत्र काबीज करीत लोकशाहीला बळकटी देत सर्व अर्थाने सक्षम होत असताना राष्ट्रीय एक्य आणि एकात्मतेच्या रक्षणाविषयी आपण पूर्णपणे शाश्वत बनलो आहेत असे छातीठोकपणे म्हणता येत नाही. याउलट भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेपुढे अनेक आव्हाने आज उभी असल्याचे चित्र दिसत आहे. धार्मिकता, भाषिक अभिमान, जातीयता, प्रादेशिकता यासंबंधीचे प्रश्न स्वतंत्रपूर्व

काळातही अस्तित्वात होते. मात्र स्वतंत्र आंदोलनाच्या काळात राष्ट्रवादाच्या सर्वसमावेशक विचारसरणीच्या प्रभावाखाली ते प्रश्न काहीसे मागे पडलेले होते. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात देशातील विविध घटना - घडामोडीवरून या विघटनकारी शक्ती डोके वर उंचावताना दिसतात. वांशिक, भाषिक, आर्थिक, जातीय भेद व धार्मिक भेद हे राष्ट्राच्या ऐक्याला बाधक असतात त्यामुळे हे घटक जेव्हा प्रबळ झालेले आहेत तेव्हा राष्ट्राच्या एक केव्हा एकात्मतेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

राष्ट्राच्या एकात्मतेपुढे प्रादेशिकतावाद या आव्हानाचे अध्ययन करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अध्ययनासाठी तथ्य संकलन करताना द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. अध्ययन विषयाशी संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी प्रकाशित, अप्रकाशित असलेले शोध अध्ययन, संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इत्यादी दुय्यम श्रोतांच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**आशय विश्लेषण :**

विशिष्ट प्रदेशाच्या वेगळेपणाचा अभिमान आणि त्या प्रदेशाचे स्थान उंचावण्यासाठी विविध आर्थिक, सामाजिक उपाययोजनांची गरज प्रदेशवादात मोडते. प्रादेशिकतेची समस्या दोन पातळ्यावर घडताना दिसून येते 1) संघराज्यातून बाहेर पडण्यासाठी. 2) एखाद्या घटक राज्यातून वेगळे होण्यासाठी आंदोलन निर्माण होऊ शकतात. प्रादेशिक प्रश्न प्रादेशिक स्तरावरच हाताळावेत त्या -त्या प्रदेशातील लोकांकडेच सत्ता असावी, प्रशासन आणि उद्योगधंदे यामध्येही त्या प्रदेशातील भूमिपुत्रांना स्पर्धेने दिले जावे, अशी आग्रही भूमिका यामध्ये असते. विस्तारित प्रदेशाचा एक घटक म्हणून आपले अस्तित्व राहणार असेल तर आपल्या प्रदेशाचा विकास घडवून येणार नाही, अशी काहीशी भीतीची, संशयाची भावना प्रदेशवादामागे दडलेली असते.

ज्या घटकांना राष्ट्रीय प्रवाहात गौण स्थान आहे असे वाटते, ती समाज घटक स्वतःची अस्मिता जपण्याचा प्रयत्न प्रदेशवादाच्या माध्यमातून करतात. बहुतेक वेळा भाषिक दुय्यमत्वातून भाषिक अल्पसंख्यांक हे भाषेच्या आधारावर स्वतंत्र होण्याचा आग्रह धरताना दिसतात. जून 2014 मध्ये तेलंगणा हे स्वतंत्र घटक राज्य निर्माण झाले. पूर्वी उत्तर प्रदेशातून उत्तराखंड आणि बिहार मधून झारखंड राज्य वेगळी करण्यात आली. सध्याही बुंदेलखंडाची मागणी जोर धरत आहे पश्चिम बंगाल मधून गोरखल्यांचे स्वतंत्र घटकराज्य बनविण्याची मागणी प्रलंबित आहे. गुजरात अंतर्गत सौराष्ट्र पिछाडीवर असल्याकारणाने तसेच प्रादेशिक असमतोल टोकाचा असल्यामुळे विदर्भातील राजकीय सामाजिक घटक वेगळ्या विदर्भाची भाषा करतात. द्राविडस्तानची मागणी, खलिस्तानची मागणी मिझोरम आणि नागालँड निर्माण पूर्वीचा मिझोचा आणि नागा लोकांचा लढा इ. प्रदेशवादाच्या मुद्द्यांनी भारतीय राजकारणावर प्रभाव पडला. या आंदोलनांनी कित्येकदा हिंसेचा आधार घेतल्याने शासन संस्थेला हस्तक्षेप करावा लागला. वर्तमानात सुद्धा प्रादेशिक वादाचा मुद्दा अधूनमधून डोके वर काढताना दिसतो.

**राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता :**

भारतात इंग्रजी सत्तेच्या स्थापनेनंतर खऱ्या अर्थाने राष्ट्रवादाचा उदय झालेला आहे. भारतामध्ये सांस्कृतिक पातळीवरील एक्याचे दर्शन फार पूर्वीपासून घडत असते तरी इंग्रजी सत्तेच्या स्थापने नंतरच त्या ऐक्याला राजकीय अविष्काराचे परिणाम लाभले आहे. इंग्रजी सत्तेविरुद्ध लढताना अर्थात भारतीय स्वतंत्र चळवळीच्या काळात सर्व भारतीय जनतेने परस्परांतील भेद विसरून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविले होते. भारतीय समाज विविध नटलेला आहे. धर्म, वंश, संस्कृती, भाषा ,चालीरीती, रूढी, परंपरा,

प्रथा इ. बाबतीत भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात विविधता दिसून येत असली तरी राष्ट्र म्हणून आपण सर्वजण एकच आहोत. अशी प्रत्येक भारतवासीयांची भावना असणे ऐक्याच्या दृष्टीने गरजेचे असते अशा प्रकारच्या भावनात्मक ऐक्यातूनाच राष्ट्रीय एकात्मतेला बळकटी प्राप्त होत असते.

राष्ट्रीय एकात्मता ही एक प्रकारची भावना आहे. ही भावना एखाद्या देशातील व राष्ट्रातील लोकांमध्ये देशाबद्दलचे प्रेम, आपुलकी तसेच बंधुत्व दर्शविते. त्याच प्रकारे ही भावना विविध धर्म, पंथ, जाती आणि संस्कृतीच्या लोकांना एकाच धाग्यात बांधून ठेवते. त्यामुळे अशी विविधता असली तरी तिला विसरून सर्व लोक एकत्र राहतात. अशा प्रकारे राष्ट्रीय एकात्मता देशाला मजबूत आणि संघटित करते म्हणजेच भारतीय संघराज्यात वास्तव्य करीत असलेल्या विविध धर्मांच्या जातीच्या तसेच विविध संस्कृतीच्या सर्व नागरिकांचे राष्ट्रीय भावनेतून मनोमिलन घडून आणणे आणि त्यांच्यात भावनात्मक एकता निर्माण करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र असा भूभाग असतो त्या राष्ट्राला भौगोलिक सीमा असतात. त्याचबरोबर त्या राष्ट्राच्या परंपरा असतात एक इतिहास असतो व ही सर्व त्या राष्ट्राची वैशिष्ट्ये असतात या सर्वांचा समन्वय म्हणजेच एकात्मता होय.

राष्ट्रीय एक्य व एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न हा दररोज म्हटलं जात असलेल्या शाळेतील प्रतिज्ञा मधूनही केला गेला आहे. इत्यादी भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. अशी ही प्रतिज्ञा सर्व भारतीयांना एक सूत्रात बांधणारी आहे. त्यातच राष्ट्रीय एकात्मतेला पोषक वातावरण तयार करण्यासाठी भारतीय संविधानात एकूण सहा मूलभूत अधिकारांची तरतूद करण्यात आली. यासोबतच संविधानातील मूलभूत कर्तव्य व मार्गदर्शक तत्वे भारतीय नागरिकास जबाबदारीची भावना वृद्धिंगत करताना परस्परात सलोखा राखण्यास मदत करतात. मात्र राष्ट्रीय ऐक्य टिकवण्यासही सहाय्यभूत ठरतात. मात्र या राष्ट्रीय ऐक्याचा व एकात्मतेचा प्रत्यय हा स्वातंत्र्यपूर्व काळात आला तसा तो स्वतंत्र नंतर देशातील काही घटना व प्रसंग वगळता दिसून येत नाही. याची उदाहरण म्हणजे जेव्हा केव्हा देशासमोर परकीय आक्रमणाची संकटे उभी राहिली फक्त त्याच काळात राष्ट्रवादाच्या भावनिक आव्हानाला भारतीय जनतेकडून प्रतिसाद मिळाला. मात्र त्या पलीकडे जाऊन देशाची राजकीय आणि सामाजिक एकात्मिकरण घडून आणण्यासाठी लागणारा सकारात्मक राष्ट्रवाद इथे विकसित झाला नाही. राष्ट्रीय एकात्मता ही राष्ट्रातील व्यक्तीची भावनिक मने जोडण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत राष्ट्रातील समाज घटकांचा सुखदुःखाचे वाटेकरी म्हणून सहभाग असणे आवश्यक आहे. मात्र असे न होता राष्ट्रीयत्वाची भावना बळकट करण्याऐवजी संकुचित वृत्ती जोपासल्या जाऊ लागल्या आहेत. परिणामी राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात आज अनेक अडथळे निर्माण झाले आहेत त्यातील एक प्रमुख अडथळा म्हणून प्रादेशिकतावादाचा विचार- विमर्श हा पुढील प्रमाणे घेतला आहे.

**प्रादेशिकतावाद :**

राष्ट्रीय एकात्मतेमधील एक प्रमुख व तितकाच गंभीर असा अडथळा म्हणून अलीकडच्या काळातील प्रादेशिकतावादाचा विशेष उल्लेख करता येईल. भारतीय जनतेमध्ये विविध कारणांमुळे राष्ट्रावरील निष्ठेपेक्षा प्रबळ झाल्यावर आपला विशिष्ट प्रादेशिक विभाग किंवा आपला प्रांत याविषयी अधिक आत्म्याचा वाटू लागली की, देशात प्रादेशिकता वादाची मूळ जोर धरू लागते. यात प्रादेशिक हितसंबंधांसाठी राष्ट्रहिताला तिलांजली दिली जाते. प्रादेशिक निष्ठा या राष्ट्रीय निष्ठेपेक्षा प्रखर बनतात व त्यातूनच राष्ट्रहिताला धोका निर्माण होत असतो.

देशातील लोकांना आपण त्या प्रांतात व प्रदेशात राहत असतो त्याविषयी आत्महत्या व अभिमान वाटणे हे साहजिकच आहे. विशिष्ट प्रदेशात कायमचे वास्तव्य केल्यामुळे त्या प्रदेशाविषयी जवळीकतेची भावना निर्माण होणे हे स्वाभाविक असते. प्रत्येक व्यक्तीच्या भावना त्या त्या प्रादेशिक

घटकांशी निगडित झालेले असतात. मात्र जेव्हा काही लोकांना आपल्या राष्ट्रापेक्षाही प्रांताविषयी किंवा घटकराज्याविषयी अधिक जवळीक वाटू लागते तेव्हा मात्र त्या राष्ट्राच्या दृष्टीने गंभीर बाब निर्माण होत असते. जेव्हा एखाद्या प्रांतातील लोकांना इतर कोणत्याही निष्ठेपेक्षा आपल्या प्रांताविषयीची किंवा विशिष्ट प्रादेशिक विभागाविषयीची निष्ठा जास्त महत्त्वाची वाटते तेव्हा प्रादेशिकतावाद जन्म घेत असतो. प्रादेशिकता वादाला सहसा एखादाच घटक कारणीभूत ठरत नाही. धर्म, जात, भाषा, सांस्कृतिक विविध, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक शोषण, एखाद्या प्रादेशिक विभागाची शासनाकडून दीर्घकाळ झालेली उपेक्षा, फुटीरतावादी संघटनांकडून लोकांची करण्यात येणारे दिशाभूल आणि त्यातच आपल्याच प्रदेशात आपल्यावर अन्याय होत असल्याची स्थानिक लोकांची भावन असे विविध घटक हे आपल्या देशातील प्रादेशिकतावादाला कारणीभूत ठरले आहेत. एखाद्या प्रदेशात विशिष्ट धर्माचे किंवा जातीचे तसेच भाषेचे लोक मोठ्या संख्येने एक ओठले असतील तर त्या आधारे त्यांच्यात प्रादेशिक अस्मिता ही जागृत केली जाऊ शकते.

देशात एकीकडे स्वातंत्र्याची चळवळ व दुसरीकडे घटना निर्मितीची प्रक्रिया सुरू असताना देशातील प्रांतरचनेचा आधार हा भाषा ठेवण्यात यावा ही मागणी जोरकसपणे पुढे आली. इथपासून सुरू झालेला प्रादेशिकतावादाचा प्रश्न आजही न सुटता वेगवेगळ्या स्वरूपात तो सातत्याने आव्हाने उभी करीत आहे. यात प्रादेशिकतेच्या प्रश्नासोबतच येणारे गैर प्रादेशिक घटक ही महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने या समस्येची उकल करणे हे भारतीय राष्ट्रीय एकात्मते पुढील एक महत्त्वाचे आवाहन होऊन बसले आहे. स्वातंत्र्यप्राप्ती होत असतानाच देशाला फाळणीच्या समस्येला सामोरे जावे लागल्यामुळे तत्कालीन राष्ट्रीय नेतृत्वाने देशाचे सार्वभौमत्व व एकता यांना प्राधान्य देणे क्रमप्राप्त होते. संघराज्य तत्त्वांचा अंमल करीत असताना भाषिक आधारावर घटक राज्य निर्मितीची मागणी पुढे आली. याबाबत केंद्र सरकारने नेमलेल्या दार आयोगानेही 1948 मध्ये सादर केलेल्या अहवालात भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती न करता ती प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने करावी जेणेकरून अन्य भाषिक अल्पसंख्याकांचे प्रश्न निर्माण होणार नाही असे स्पष्ट होते.

**भारतातील प्रादेशिकतावादाचे स्वरूप :**

देशात प्रादेशिकतावाद निर्माण होण्यास वा या विकृतीला बढावा मिळण्यास केवळ भाषा हा एकच आधार नाही तर तो वेगवेगळ्या स्वरूपात अविष्कृत होत असतो.

**सांस्कृतिक अस्मिता :**

वेगवेगळ्या सांस्कृतिक अस्मिता व त्यातून केली जाणारी वेगवेगळ्या राज्याची मागणी याचा उल्लेख यात करता येईल. उदा. तामिळनाडूतील द्रमुकने चालविलेली विघटनाची चळवळीचे असे म्हणणे होते की, इतर भारतापेक्षा दक्षिण भारताची संस्कृती भिन्न आहे त्यातून मद्रास, केरळ, म्हैसूर मिळून एक द्रविडीस्तान निर्माण करण्यात यावे.

**भाषिक अस्मिता :**

मातृभाषेविषयी अभिमान ही चिंतेची बाब नसली तरी भाषिक दुराभिमान हा निश्चितच चर्चेचा विषय बनतो. भाषेच्या आधारावरूनच भाषावार प्रांतरचनेची मागणी पुढे आलेली होती. भाषेच्या तत्त्वावर प्रांतांची पुनर्रचना झाल्यावर देशात संकुचित प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर वाढीस लागल्या. देशातील निरनिराळ्या प्रांतांमध्ये सीमा प्रश्नासारखे वादग्रस्त प्रश्न निर्माण झाले. त्यातून विविध भाषकांत कटूता निर्माण झाली. याचाच दुसरा एक परिणाम म्हणजे विविध राज्यात भाषिक दुराभिमान बाळगणाऱ्या संघटना उदयास आल्या.

**मागासलेपणाची भावना :**

देशातील विविध घटकराज्यांची प्रगती एकसारखी दिसत नाही. त्यांच्या विकासात व आर्थिक परिस्थितीमध्ये पराकोटीची विषमता आढळते. सरकारच्या नव्या आर्थिक धोरणामुळे काही राज्याचा विकास झाला तर काही कायमचे मागासलेले राहिले. तसेच राज्यातील काही प्रदेशाचाही व सर्व भागांचा विकास समतोल रीत्या झालेला नाही. उदा. महाराष्ट्रातून जात विदर्भ व मराठवाडा या भागावर नेहमीच अन्याय होतो अशी या भागातील जनतेची तक्रार नेहमीच असते.

**भौगोलिक परिस्थिती :**

विशाल असा भारताचा भूप्रदेश हा एकसंघ असला तरी त्यातील विविध प्रदेशात मोठ्या प्रमाणात विविधता आढळते. भारतात आजच्या परिस्थितीला 28 राज्य व नव केंद्रशासित प्रदेश आहेत या सर्व भागातील भौगोलिक परिस्थिती एकसारखी नसून त्यात भिन्नता आहे. त्यातील एक भाग हा दुसऱ्या भागापेक्षा स्वतःला वेगळा समजतो. त्यामुळे संघर्षाची स्थिती उद्भवून प्रांतवादाला खतपाणी मिळत असते.

**प्रादेशिक संघटनांचे नेतृत्व :**

भारताच्या राष्ट्रीय राजकारणावर आज प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व निर्माण होताना दिसते. या प्रादेशिक पक्ष व संघटनांमुळे प्रादेशिकता वाढण्यास मदत झाली आहे. अशा प्रादेशिक संघटनांनी व पक्षांनी घटक राज्यांना अधिक स्वायत्तता देण्याची मागणी वारंवार केलेली दिसते. उदा. तमिळनाडू तसेच पूर्वी जम्मू-काश्मीर येथील प्रादेशिक पक्षांनी घटक राज्यांना अधिक स्वायत्तता देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

**अन्य प्रांतीयांना विरोध :**

आपले घटक राज्य व त्यातील विशिष्ट भागाविषयी अति अभिमानातून निर्माण होणाऱ्या भूमीपुत्रवादाच्या संकल्पनेमुळे दुसऱ्या राज्यातील लोकांविषयी तिरस्काराच्या भावनेला मोकळीक त्या मिळाली आहे. या भूमिपुत्रवादाच्या संकल्पनेतूनच महाराष्ट्रात शिवसेना, मनसे, यांची बिहार व उत्तर प्रदेशातील स्थलांतरितांना विरोध, आसाम मध्ये उल्फा संघटनेची बंगाली व बिहारी नागरिकांच्या स्थलांतराला विरोध करणारी आंदोलने झालीत.

**विघटनवाद :**

विघटनवाद हे प्रादेशिकता वादाचे उग्र असे स्वरूप आहे. प्रादेशिकतेचा अतिरेक होऊन भारतातून फुटून बाहेर निघण्याचा प्रयत्न काही घटक राज्यांनी केला होता. उदा. औद्योगिक विकासाच्या बाबतीत दक्षिणात्य राज्यांकडे केंद्राने पुरेसे लक्ष दिलेले नाही असा आरोप करीत तमिळनाडूतील द्रमुकने विघटन वाद्य व फुटीरतावादी भूमिका घेतली होती. अशी विघटनवादाच्या भूमिकेचे समर्थन करणाऱ्या पंक्तीत पंजाब मधील खलिस्तान व ईशान्य भारतातील त्रिपुरा, आसाम, मनिपुर, नागालँड, मिझोराम, मेघालय या प्रदेशाचा उल्लेख करता येईल.

**निष्कर्ष :**

भाषावार प्रांतरचना, प्रादेशिक असमतोल, दुर्लक्षित समाज घटकांमधील जाणीव जागृती, काँग्रेसचा एक छत्री राज्यकारभार, प्रादेशिक पक्षांचा उदय, प्रबळ विरोधी पक्षांची कमतरता, प्रादेशिक वर्तमानपत्रांची भूमिका, विकास प्रक्रियेमुळे विशिष्ट प्रदेशातील स्थानिक लोकांच्या जीवनात हस्तक्षेप, प्रबळ केंद्रीय सत्तेकडून राजकारणावर कुरघोडी, आर्थिक नियोजनात राज्यांना दुय्यम स्थान, प्रादेशिक भांडवलदारांचा उदय, आणि मागास जातीचे राजकारण अशा विविध कारणातून प्रदेश वादाची समस्या मूळ धरू लागते.

संविधानातील संघराज्य रचना हा राष्ट्रीय व प्रादेशिक निष्ठांचा त्यांच्या परीने मेळ घालण्याचा प्रयत्न होता मात्र प्रादेशिकतेची भावना आणि राष्ट्रीय एकात्मता यांचा नीट समन्वय निर्माण करणे भारतीय राज्यव्यवस्थेला जमले नाही त्यातूनच प्रादेशिकतावाद या नकारात्मक निष्ठेची जोपासणाऱ्या संकल्पनेला पोषक वातावरणाची निर्मिती झाली. या प्रादेशिकतावादाचा अतिरेक झाला की, त्याची परिणीती त्या प्रदेशात विघटनवादी किंवा फुटीरतावादी शक्ती प्रबळ होण्यात होते. प्रादेशिकतावादामुळे निरनिराळ्या प्रांतातील विशिष्ट प्रादेशिक विभागात वेगवेगळ्या घटक राज्यांची मागणी पुढे येते. अनेक घटक राज्याकडून करण्यात येत असलेल्या वाढत्या स्वायत्ततेच्या मागण्या, भाषा किंवा संस्कृतीच्या आधारे पोचला जात असलेला संकुचित पणा या सर्वांचे मूळ प्रादेशिकतावादातच आहे. यातूनच राष्ट्रीय एकात्मतेला मोठा धोका आहे.

**संदर्भ :**

1. 'प्रादेशिकतावादाची समस्या' - loksatta.com - 8 June 2021.
2. Keen Samantha - ' पुन्हा एकदा भाषावाद ' - orfonline.org - 26 June 2019.
3. लोटे रा. ज. - ' भारतीय शासन आणि राजकारण ' , पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर - 2009.
4. पळशीकर सुहास, - ' समकालीन भारतीय राजकारण प्रतिमा प्रकाशन, पुणे. - 2004.
5. Narine Rita, ' प्रादेशिकतावाद आणि भाषावाद ' - brainly.in - 29 मार्च 2019.